बेटी बचाओ • बेटी पढाओ

# मातोश्री

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट द्वारा संचालित

## मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

E-mail : makm.college@gmail.com

२०११
वार्षिकांक

# आमचे प्रेरणा स्थान



स्व. श्रीमती माँ विठाईलक्ष्मी तुळसकर

# आमचे श्रद्धा स्थान



स्व. सौ. आशाताई त्र्यंबकराव कुणावार

# आमचे मार्गदर्शक



**श्री. पांडुरंगजी तुळसकर**

अध्यक्ष

**विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा.**

# व्यवस्थापन समिती



डॉ. निलेश तुळसकर



श्री. पांडुरंगजी तुळसकर



प्रा. डॉ. उमेश तुळसकर



श्री. विजयराव ईटनकर





सौ. रेखा तुळसकर

## विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट

(रजि. नं. महा. २०४/८५ एफ ६७० वर्धा)

### संचालक मंडळ

| | |
|---|---|
| श्री. पांडुरंगजी तुळसकर | अध्यक्ष |
| प्रा. डॉ. उमेश तुळसकर | सचिव |
| डॉ. निलेश तुळसकर | उपाध्यक्ष |
| श्री. विजयराव ईटनकर | सहसचिव |
| सौ. रेखाबाई तुळसकर | कोषाध्यक्ष |
| श्रीमती शांताबाई तळवेकर | सदस्या |
| श्री. दादाजी वरभे | सदस्य |



श्रीमती शांताबाई तळवेकर



श्री. दादाजी वरभे

# मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

## महाविद्यालय विकास समिती २०१९-२०

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६
या कायद्यातील कलम ९७ (१) च्या
अंतर्गत महाविद्यालयीन समिती



श्री. पांडुरंगजी तुळसकर



डॉ. निलेश तुळसकर

१) श्री. पांडुरंगजी तुळसकर - पदसिद्ध अध्यक्ष
२) प्रा. श्रुती जयस्वाल - अध्यापक सदस्य
४) प्रा. सपना जयस्वाल - अध्यापक सदस्य
५) प्रा. अभय दांडेकर - अध्यापक सदस्य
६) प्रा. डॉ. नयना शिरभाते - अध्यापक सदस्य
७) श्री. अमित रेंढे - अध्यापकेत्तर सदस्य
८) श्री. प्रभाकर आंबटकर - उद्योग सदस्य
९) श्री. विजयराव इटनकर - समाजसेवा सदस्य
१०) डॉ. निलेश तुळसकर - संशोधन सदस्य
११) प्रा.डॉ.राजविलास कारमोरे - निमंत्रीत सदस्य
१२) प्राचार्य डॉ. उमेश तुळसकर -पदसिद्ध सचिव



प्रा.डॉ.आर.आर. कारमोरे



प्रा. डॉ. नयना शिरभाते



प्रा. अभय दांडेकर



प्रा. सपना जयस्वाल

महाविद्यालय विद्यार्थी परिषदेचे सभापती व सचिव
(विद्यार्थ्यांच्या निवडीनुसार सदस्य घेण्यात येईल)



श्री. अमित रेंढे



प्रा. श्रुती जयस्वाल



प्राचार्य डॉ. उमेश तुळसकर



श्री. विजयराव ईटनकर



श्री. प्रभाकर आंबटकर

# मातोश्री वार्षिकांक २०१८-२०१९

बेटी बचाओ • बेटी पढाओ

## संपादक मंडळ

कार्यकारी संपादक

प्रा. अभय हिरामणजी दांडेकर

### सहसंपादक

प्रा. सपना जयस्वाल

प्रा. अश्विनी चौधरी

प्रा. वैशाली तडस

प्रा. मोनाली गिरडे

### * मराठी विभाग

प्रा. सुवर्णा कान्होलीकर

प्रा. पुनम बुरीले

प्रा. भाग्यश्री साबळे

### * इंग्रजी विभाग

प्रा. संगीता लांडगे

### * हिंदी विभाग

प्रा. डॉ. स्वर्णलता बागडे

### * साहित्य संकलन व संपादन

प्रा. विद्या झिलपे

प्रा. मोनीका माऊरकर

### * छायाचित्र मांडणी

प्रा. आशा घाटे

प्रा. प्रतिभा दुबे

### * विद्यार्थी संपादक मंडळ *

कु. अंजली भानखेडे - बी.ए. भाग-२

कु. साक्षी बुल्ले - बी.ए.सी. भाग-२

कु. खुशबू लोणारे - बी.ए.सी. भाग-१

कु. युक्ता मोटवाणी - बी.कॉम भाग-१

### * प्रकाशक

प्राचार्य डॉ. उमेश तुळसकर

### * मुद्रक

विजयलक्ष्मी प्रिंटर्स, हिंगणघाट

### * ग्राफिक्स/अक्षरजुळणी

श्री. विजय झोडे

या वार्षिकांकामध्ये प्रकाशित झालेल्या साहित्यातील/लेखांमधील मते ही त्या लेखकांची स्वत:ची मते असून त्यांच्याशी प्रकाशक, मार्गदर्शक, वार्षिकांक समिती, संपादक मंडळ किंवा संस्था सहमत असेलच असे नाही.

- प्रकाशक

एकूण प्रति - १५००

# मनोगत...

महाविद्यालयीन घडामोडींचा शब्दरूपी वेध घेणारा 'मातोश्री' २०१८-१९ वार्षिकांक आपल्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे.

आमचे महाविद्यालय महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त संलग्नित आहे. या महाविद्यालयाची सुरुवात जून, २०१८ मध्ये झाली. पदवी स्तरावरील कला-वाणिज्य व विज्ञान शाखांमध्ये केवळ १००-२०० विद्यार्थीनींच्या प्रवेशाने सुरू झालेल्या महाविद्यालयात आज जवळजवळ ४०० विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत.

आमचा उच्च गुणवत्ताधारक व आचार्य पदवी प्राप्त प्राध्यापक वर्ग कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थीनींना उत्कृष्टरित्या विद्यादान करीत आहे.

सांस्कृतिक महोत्सव, राष्ट्रीय सेवा योजना, महिला अध्ययन केंद्र, या आणि अशा अनेक शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थीनींचा सर्वांगीण विकास साधणे हेच आमचे ध्येय आहे. अनेक स्पर्धांमध्ये विद्यार्थीनींनी विद्यापीठ व राज्यस्तरावर प्रतिनिधीत्व केले आहे.

विद्यार्थीनींच्या उत्कर्षासाठी सर्व सुविधायुक्त संगणकीय कार्यालय व ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा इ. योजनांसह विद्यार्थीनींकेंद्री शिक्षणव्यवस्था राबविण्याचा आमचा संकल्प आहे.

आधुनिक शैक्षणिक सोयीसुविधा तळागाळातील विद्यार्थीनीपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने व आमच्या संस्थेतील पदाधिकाऱ्यांच्या प्रेरणेमुळेच 'मातोश्री' सारखा अंक आपल्या हाती देता येणे शक्य झालेले आहे.

आदरणीय श्री.पांडुरंगजी तुळसकर, अध्यक्ष, विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, डॉ.निलेश तुळसकर, उपाध्यक्ष, यांचे सदैव-तत्पर मार्गदर्शन व सहकार्यामुळेच हे सर्व शक्य होत आहे. तसेच सेवेचे व्रत उराशी बाळगणारे समस्त कर्मचारीवृंद व आमच्या विद्यार्थीनी यांचेही सहकार्य मोलाचे आहे.

'मातोश्री-२०१९' या अंकात अनवधानाने काही त्रुटी आढळल्यास संपादक मंडळाच्या निदर्शनास आणून द्याव्यात जेणेकरून पुढील अंकात त्यासंदर्भात दक्षता घेता येईल, अशी अपेक्षा करतो. शेवटी सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छांसह, धन्यवाद !

प्राचार्य
**डॉ. उमेश तुळसकर**
मातोश्री आशाताई कुणावार महिला महाविद्यालय,
हिंगणघाट, जि. वर्धा.

# मनोगत...

महाविद्यालयीन घडामोडींचा शब्दरूपी वेध घेणारा 'मातोश्री' २०१८-१९ वार्षिकांक आपल्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे.

आमचे महाविद्यालय महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त संलग्नित आहे. या महाविद्यालयाची सुरूवात जून, २०१८ मध्ये झाली. पदवी स्तरावरील कला-वाणिज्य व विज्ञान शाखांमध्ये केवळ २००-२५० विद्यार्थीनीच्या प्रवेशाने सुरू झालेल्या महाविद्यालयात आज जवळजवळ ४०० विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत.

आमचा उच्च गुणवत्ताधारक व आचार्य पदवी प्राप्त प्राध्यापक वर्ग कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थीनींना उत्कृष्टरित्या विद्यादान करीत आहे.

सांस्कृतिक महोत्सव, राष्ट्रीय सेवा योजना, महिला अध्ययन केंद्र, या आणि अशा अनेक शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थीनींचा सर्वांगीण विकास साधणे हेच आमचे ध्येय आहे. अनेक खेळांमध्ये विद्यार्थीनीनी विद्यापीठ व राज्यस्तरावर प्रतिनिधीत्व केले आहे.

विद्यार्थीनीच्या उत्कर्षासाठी सर्व सुविधायुक्त संगणकीय कार्यलिय व ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा इ. योजनांसह विद्यार्थीनीकेंद्री शिक्षणव्यवस्था राबविण्याचा आमचा संकल्प आहे.

आधुनिक शैक्षणिक सोयीसुविधा तळागाळातील विद्यार्थीनीपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने व आमच्या संस्थेतील पदाधिकाऱ्यांच्या प्रेरणेमुळेच 'मातोश्री' सारखा अंक आपल्या हाती देता येणे शक्य झालेले आहे.

आदरणीय श्री.पांडुरंगजी तुळसकर, अध्यक्ष, विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, डॉ.निलेश तुळसकर, उपाध्यक्ष, यांचे सदैव-तत्पर मार्गदर्शन व सहकार्यामुळेच हे सर्व शक्य होत आहे. तसेच सेवेचे व्रत उराशी बाळगणारे समस्त कर्मचारीवृंद व आमच्या विद्यार्थीनी यांचेही सहकार्य मोलाचे आहे.

'मातोश्री-२०१९' या अंकात अनवधानाने काही त्रुटी आढळल्यास संपादक मंडळाच्या निदर्शनास आणून द्याव्यात जेणेकरून पुढील अंकात त्यासंदर्भात दक्षता घेता येईल, अशी अपेक्षा करतो. शेवटी सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छांसह, धन्यवाद !

**प्राचार्य**
**डॉ. उमेश तुळसकर**
मातोश्री आशाताई कुणावार महिला महाविद्यालय,
हिंगणघाट, जि. वर्धा.

# संपादकीय...

माझ्या लाडक्या विद्यार्थीनींनो....

या वर्षी आपल्या महाविद्यालयात तुमच्या कलागुणांना शब्दांकित करत शब्दांना नवा आकार देत तुमच्या भावविश्वाला साकारत 'मातोश्री' वार्षिकांक प्रकाशित होत आहेत. तुमच्या कलात्मकतेचा आरसा, तुमच्या भावजीवनाचा सखासोबती, तुमच्या सर्जशीलतेचा भाष्यकार, मातोश्री आशाताई कुणावार महिला महाविद्यालयाचा चेहरा असणारा मातोश्री अंक तुमच्यापर्यंत पोहचवताना अतिशय आनंद होत आहे. कारण विद्यार्थीनींनों मातोश्री फक्त कागदी दस्ताऐवज नाही तर तो भूत, भविष्य आणि वर्तमानाच्या संचिताचा मोठा ठेवा आहे...

तुमच्या कलात्मक जीवनाला नवा आकार मिळावा, तुमच्या आतला आवाज बाहेर यावा, तुम्ही बोलते व्हावे, लिहिते व्हावे. देशातील समकालीन प्रश्नांवर आणि सभोवतालच्या चांगल्या वाईट परिस्थितीवर तुमचं संवेदनशील मन बोलतं, लिहितं व्हावं हाच मातोश्री अंकाचा हेतू. माझा विद्यार्थीनी वाङ्मयीन, सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक जीवनात पारंगत व्हावी यासाठीच मातोश्री अंकाची निर्मिती करणे होय..

विद्यार्थीनीच्या ललित वाङ्मयीन लेखनातून, अभ्यासपूर्ण लेखातून, काव्यातून, आणि आपल्या महाविद्यालयातील अभ्यासू, कष्टाळू प्राध्यपकांच्या केलेल्या शैक्षाणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्याचा आढावा मातोश्री वार्षिकांकात लेखनरूपानं साकार झाला आहे. नक्कीच विद्यार्थीनीना यातून ऊर्मी मिळेल यात दुमत नाही.

मातोश्री वार्षिकांकरिता खूप मोठा मदतीचा हात देणारे आमचे मार्गदर्शक आदरणीय श्री.पांडुरंगजी तुळसकर, अध्यक्ष, विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, मा.डॉ.निलेश तुळसकर, उपाध्यक्ष, प्राचार्य डॉ.उमेश तुळसकर, यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. कारण यांच्या मायेच्या उबेशिवाय मातोश्री अंक आकार घेऊ शकला नसता.

मला आणि मातोश्री वार्षिकांकाच्या जडणघडणीत आपुलकीने मदत करणारे वार्षिकांक सामिती सदस्य प्रा. सपना जयस्वाल, प्रा. अश्विनी चौधरी प्रा. वैशाली तडस, प्रा. मोनाली गिरडे आणि महाविद्यालयातील विद्यार्थीनी तसेच उत्कृष्ट टंकलेखन करणारे श्री. विजय झोडे सजावट करणारे श्री विजयलक्ष्मी प्रिंटर्स, हिंगणघाट या सर्वांच्या सहकार्यानं मातोश्री वार्षिकांक कमीत कमी वेळेत तयार झाला. यासर्वांचे मनापासून आभार मानतो आणि माझ्या शब्दरूपी संपादकीय भाष्याला थांबवतो...

पुन्हा भेटू...

**प्रा. अभय हिरामणजी दांडेकर**
(इंग्रजी विभाग)
मातोश्री आशाताई कुणावार महिला महाविद्यालय, हिंगणघाट, जि. वर्धा.

# प्रिय गुरूजी

सगळीच माणसे न्यायप्रिय नसतात,
नसतात सगळीच सत्यनिष्ठ,
हे शिकेलच माझा मुलगा कधी ना कधी,
मात्र त्याला हे देखील शिकवा-जगात
प्रत्येक बदमाषगकणिक असतो एक
साधुचारित पुरूषोत्तमही, स्वार्थी
राजकारणी असतात. जगात तसे
असतात, अवघं आयुष्य समर्पित
करणारे नेतेही असतात, टपलेले वैरी
तसे जपणारे मित्रही!

मला माहीत आहे. सगळ्या गोष्टी
झटपट नाही शिकवता येत... तरीही
जमलं तर त्याच्या मनावर ठसवा, घाम
गाळून कमावलेला एकच छदाम
आयत्या मिळालेल्या घबाडापेक्षा
मौल्यवान आहे. हार कशी स्वीकारावी
ते त्याला शिकवा, आणि शिकवा
विजयाचा आनंद संयमानं घ्यायला!

तुमच्यात शक्ती असली तर त्याला
द्वेषमत्सरापासून दूर रहायला शिकवा,
शिकवा त्याला, आपला हर्ष संयमानं
व्यक्त करायला. गुंडाना भीत जाऊ
नको म्हणावं, त्यांना नमवणं सर्वांत
सोपं असतं!

जमेल तेवढं दाखवीत चला त्याला
ग्रंथभांडाराचं अद्‌भुत वैभव मात्र
त्याबरोबरच, मिळू दे त्याच्या मनाला
निवांतपणा सृष्टीचे शाश्वत सौंदर्य
अनुभवायला पाहू दे त्याला पक्ष्यांची
अस्मान भरारी... सोनेरी उन्हात
भिरभिरणारे भ्रमर... आणि हिरव्यागार
डोंगर उतारावर डुलणारी चिमुकली फुले

शाळेत त्याला हा धडा मिळू दे, फसवून
मिळालेल्या यशापेक्षा सरळ आलेले
अपयश श्रेयस्कर आहे. आपल्या
कल्पना, आपले विचार यांच्यावर दृढ
विश्वास ठेवायला हवा त्याने बेहेत्तर
आहे सर्वांनी त्याला चूक ठरवलं तरी!

त्याला सांगा, त्यांनं भल्यांशी भलाईनं
वागावं, आणि टग्यांना अद्दल घडवावी.
त्याला हे पुरेपूर समजवा, की करावी
कमाल कमाई त्याने ताकद आणि
अक्कल विकून... पण कधीही विक्रय
करू नये हृदयाचा आणि आत्म्याचा!
धिक्कार करणाऱ्यांच्या झुंडी आल्या
तर कानाडोळा करायला शिकवा त्याला
आणि ठसवा त्याच्या मनावर सत्य व
न्यायासाठी पाय रोवून लढत रहा.

त्याला ममतेने वागवा पण लाडावून
ठेवू नका. आणि हेही त्याला सांगा,
ऐकावं जनांचं, अगदी सर्वांत... पण
गाळून घ्यावं ते सत्याच्या चाळणीतून
आणि फोलपट टाकून निकं सत्व तेवढं
स्वीकारावं.

अगदी तावून सुलाखुन
निघाल्याशिवाय लोखंडाचं कणखर
पोलाद होत नसतं. त्याच्या अंगी
बनवा, अधीर व्हायचं धैर्य, अन् धरला
पाहिजे धीर त्यांन जर गाजवायचं असेल शौर्य!

आणखीही एक सांगत रहा त्याला,
आपला दृढ विश्वास पाहिजे
आपल्यावर तरच जडेल उदात्त श्रद्धा
मानवजातीवर जमलं तर त्याच्या
मनावर बिंबवा-हसत रहावं उरातलं
दुःख दाबून, आणि म्हणावं त्याला, आसू
ढाळावायची लाज वाटू देऊ नको त्याला
शिकवा. तुच्छतावाद्यांना तुच्छ
मानायला, अन् चाटुगिरीपासून सावध
रहायला. माफ करा गुरूजी! मी फार
बोलतो आहे, खूप काही मागतो आहे...
पण पहा... जमेल तेवढं अवश्य करायचं!

माझा मुलगा भलताच गोड छोकरा आहे हो तो!!!

\- अब्राहम लिंकन

# स्त्री



जीवन सुंदर नसतं ते कराव लागतं
विषाच्या समुद्रातून अमृत काढाव लागतं
यशाच्या प्राप्तीसाठी दुःख सहन कराव लागतं
वाटेवर आलेल्या संकटांना दूर साराव लागतं,

संकटांना न घाबरता समोर जाव लागतं
मन डगमगले तरी समजाव लागतं
जगाला आपली ओळख देण्यासाठी
स्वतः ला पेटवाव लागतं
स्वतःच्या भावनांना मनात दडवाव लागतं,

हेच जगाला पटवून दयानं लागतं
तेव्हाच स्त्री म्हणून नव्हे तर
माणूस म्हणून जगण्याची
संधी मिळते. असं आज
तुम्हाला सांगावस वाटतं.

कु. अंजली भानखेडे
बी.ए. प्रथम

# बाबा

बाबा जग दाखवलं तुम्ही
खेळायला शिकवल तुम्ही
हातात हात देऊन चालायला
शिकवल तुम्ही
मग का बाबा
अर्ध्यावरती सोडून गेलात तुम्ही
का मग फक्त एवढे क्षण आनंदाचे
दिले तुम्ही
एवढ्या मोठ्या जगात मला एकट
सोडल तुम्ही
खुप आठवण येतीये तुमची
बाबा मला खर सांगा
पुन्हा कधी याल का हो
भेटायला तुम्ही

कु. तुळशी सोरटे
बी.ए. प्रथम

# मला मुलगी व्हायचंय

काळ्या कुट्ट अंधारात या
सगळ्यासोबत जगायचंय
मला मुलगी व्हायचंय.....!

सुट्टी पाहण्यासाठी
एक सुंदर माणूस बनायचं
आई तुझ्या पोटी मला
पुन्हा एकदा जन्मायचं

दृष्टी ज्यांची निच असते
त्यांना ठणकावून सांगायचंय
त्या घाणेरड्या राक्षसांशी
मला पुन्हा पुन्हा झगडायचंय

कु. संपदा चाफले
बी.ए. प्रथम

# शिकवणी.....

गुलाब सांगतो,
येता जाता रडायचं नसतं
काट्यात सुद्धा हसायचं नसतं

रातराणी म्हणते,
अंधाराला घाबरायचं नसतं
काळोखातही फुलायचं असतं

सदाफुली सांगते,
रूसुन रूसुन रहायचं नसतं
हसुन हसुन राहायचं असतं

छकुली म्हणते,
आपल्या रंगाने हिरमुसायचे नसते
गुणाच्या गंधाने जिंकायचे असते

कमळ म्हणतो,
संकटात चिखलात बुडायचं नसते
संकटांना बुडवून फुलायचं असते

**कु. हिना चौधरी**
बी.ए. प्रथम

# बेभान मुलगी

आई तुझी मूर्ती डोळ्यासमोर येता
विसरलेली भान मी काय करू आता
सांग आई सांग .....
तुझ्या मायेची वर्षा होता
दिसला नाही पाऊस, वारा
आठवण तुझी गं येता
डोळी आसवांच्या धारा
रडतो तुझा गं तान्हा
म्हणतो आई आई
मज कुशीत घेण्या ये गं घाई घाई .....१
मी करते प्रणाम तुजला
मी कसे भान विसरले
मलाच ठाऊक नाही
जिकडे तिकडे मज दिसतेस आई
गोठ्यात वासराला चाटतात गाई
घरट्यात पाखराला दाणे
भरवितात चिऊताई
त्याच्यांत लपली का गं आई
मला सांग ना गं .....२
करिते देवास एक विनंती
अशी प्रेमळ मायेची मूर्ती
जगात कीर्तीरूपे उरून पुरली
कुणी न हिसकावी
तान्ह्या लेकरांची आई
होती त्या जगात यशोदा
या जगात दिसली नाही.
येता संकट तिचा पिलांना
ती रक्षणार्थ उभी राही .....३



**कु. लक्ष्मी सोनटक्के**
बी.कॉम. प्रथम

# आतला राग

घेतलेले विचार मनी
येणार नाही कधीच ध्यानी
दिसे चेहऱ्यावर मोठी शांती
पण आत त्याच्या जळे क्रांती
मित्रांची पंगत जमली मस्त
का कोणी फक्त त्याच्या रागाने त्रस्त
आनंद झाला जरी अपार
तरी राग त्याचा जिवापाड
कितीही मोठा जरी असला श्रेष्ठ
का असतोच तसा करतो सर्वांना-भ्रष्ट
करतांना कोणतीही कामे
करी आपटा-आपट रागाच्या नामे
जसा आल्यावर होतो तो भारी
सगळ्या गोष्टीची करतो ती न्याहरी
क्षणभर करी कोणताही विचार
लवकरच कोणी त्यालाही नकार
राग म्हणतो,
जाणुनी घे माझ्यातली
एवढीसी एक गोष्ट
तुला व्हायचे आहे का
माझ्याकडून फस्त ?

कु. निलीमा सोनवणे
बी.कॉम. प्रथम

# पत्र

लिहायचं तर होतं फार मोठं
पण शब्दच सुचत नव्हतं
कुठून सुरु करावी लिहायला
अजुन तरी हेच कळत नव्हतं
मी तुझ्यावर प्रेम करतेय
पण सांगायची तुला हिंमत होत
नव्हती. वाटतं कधी सांगुन दयाव
सार काही तुला एकदाचं.........

पण तू समोर आलास की शब्दच
निघत नव्हते.
विचार असायचा माझ्या मनात सतत
तुझं उत्तर काय राहील
होकार देशील की नाकार देशील
याच विचाराने किती तरी रात्र
मी झोपलीच नाही.

बऱ्याच दिवसांनी हिंमत करुन
लिहिल्या या काही ओळी तुझ्यासाठी
माझे तुझ्यावर प्रेम आहे.
इतकच सागतेय या शब्दातुनी
होकार असेल तर तसे कळव मला

कु. मोना चावरे
बी.कॉम. प्रथम

# आठवण

डोळे बंद होता
चेहरा तुझा समोर यावा.....
आठवण येता मनी
आवाज तुझा कानी पडावा.....
स्वप्न दिसता कधी
भास तुझा जानवावा.....
चलविचल मन क्षणी
हात तुझा हाती असावा.....
रोजच्या श्वासातही
तुझ्याच नावाचा जप असावा

कु. साक्षी बुल्ले
बी.एस.सी. प्रथम

# असो.....

उत्तर देत नाहीस हल्ली
माझ्या मनातल्या असंख्य प्रश्नांची
असे कित्येक प्रश्न रांगेत उभे असतात
प्रश्नचिन्हांचं ओझ घेऊन..... असो
स्वप्नातही येत नाहीस हल्ली
माझ्या कित्येक रात्री वाट पाहतात
रोज एक नवी आस घेऊन डोळे मिटतात
अन खिन्न मनानं जाग्या होतात..... असो
दादही देत नाहीस हल्ली
माझ्या तुझ्यावर केलेल्या कवितांना
प्रतिक्षेत असतात त्या तुझ्या प्रतिकवितांच्या
अन् मग हरवून जातात माझ्या डायरीत..... असो
भेटत ही नाहीस हल्ली
पण तू दिलेलं वचन लक्षात आहे माझ्या
तेवढं मात्र पाळ नक्की
बाकी सगळ..... असो

कु. अश्विनी पत्रकार
बी.एस.सी. प्रथम

# ओळख

आई ने वनवलं, वावांनी घडवलं,
आईने शव्दांची ओळख करून दिली,
बावांनी शव्दांचा अर्थ समजवला,
आईने विचार दिले,
बाबांनी स्वांतत्र्य दिले,
आईनी भक्ती शिकवली,
बाबांनी वृत्ती शिकवली,
आईने लढण्यासाठी शक्ती दिली,
बाबानी जिंकण्यासाठी निती दिली,
त्यांच्या परिश्रमामुळे यश माझ्या हाती आहे.
म्हणून तर माझी ओळख आहे.

कु. देवयानी शिंगोटे
बी.एस.सी. प्रथम

# स्वच्छतेचे जनक संत गाडगेबाबा महाराज



'गोपाला, गोपाला देवकीनंदन गोपाला' अरे ! हे वाक्य ऐकलेत काय तुम्ही ? हो ना ! मग हे शब्द ऐकल्यानंतर आपणास असे वाटते टाळ्यांच्या गजरा मध्ये हे वाक्य तालात गावे. चला, आता आपण वळूया संत महान गाडगे महाराज यांच्यावर प्रकाश टाकूया. गाडगे महाराजांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६, मृत्यू २० डिसेंबर १९५६. हे गाडगे बाबा म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्र राज्यातील एक कीर्तनकार, संत आणि समाजसुधारक होते. त्यांनी स्वच्छेने गरीब रहाणी स्वीकारली होती ते सामाजिक न्याय देण्यासाठी विविध गावांना भटकत असत. गाडगे महाराजांची सामाजिक न्याय आणि सुधारणा आणि स्वच्छता या विषयांत जास्त रूची होती. विसाव्या शतकातील समाजसुधारक आंदोलनांमध्ये ज्या महापुरूषांचा सहभाग आहे, संदर्भ हवा हे एक संत होते त्यांचे दुसरे नाव डेबू होते.

हे ईश्वर कशात आहे ही नेमकी जाणीव असलेले संत आणि गोरगरीब, दीनदलित यांचा ऐहिक व अध्यात्मिक विकास होण्यासाठी; अज्ञान, अंधश्रध्दा, अस्वच्छता यांचे उच्च्याटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे होते. गाडगे महाराजांचे चिंध्याची गोधडी हे महावस्त्र होते. ते तुटक्या पादत्राणांचे विजोड जोडपायी वापरत. डोईवर फुटके मडके असे. भोजनाच्या वेळी थाळी म्हणून आणि भोजनानंतर शिरस्त्राणे म्हणून त्याचा वापर होत असे. त्यांनी कशाचाही संग्रह केला नाही, कशाची हाव बाळगली नाही. १९१२ मध्ये त्यांचा कुंताबाईशी विवाह झाला; परंतु संसारात त्यांचे मन रमले नाही. काही वर्षांनी घर सोडून तीर्थयात्रा करीत ते फिरू लागले.

बाबांनी धर्मशाळा, घाट, अन्नछत्रे आणि सदावर्त बांधली. फिरते दवाखाने सुरू केले. बाबा स्वत: निरक्षर होते पण समाजसुधारक आणि शिक्षण प्रसारक होते. 'सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज काढून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी त्यांच्या ऋणविमोचनाचा अल्पसा प्रयत्न केला.

श्री. डेबुजी झिंगराजी उर्फ गाडगे महाराज यांचा जन्म विदर्भातील कोते या खेडेगावी झाला. ते परीट समाजातील होते. गाडगे महाराजांनी वयाच्या आठव्या वर्षापासून आपल्या घरातील विपन्न परिस्थितीचे, आपल्या समाजाच्या मागासलेपणाचे, समाजाच्या अडाणीपणाचे निरीक्षण केले. महाराजांनी आपल्या मामाची शेती स्वत:च्या अपरिमित परिश्रमातून फुलवून अज्ञान, दारिद्रय, अंद्धश्रद्धाळू असलेल्या आपल्या समाजापुढे आपल्या श्रमाचा आदर्श ठेवला. गाडगे महाराज कठोर परिश्रम करून जीवन जगत होते. एके दिवशी एका जटाधारी तेजस्वी योग्याने शेतात येऊन त्यांना प्रसाद दिला. रात्रभर त्यांना स्मशानात बसवुन घेऊन आपली पारमार्थिक साधना त्यांनी गाडगे महाराजांना दिली. गाडगेमहाराजांना त्या जटाधारी योगी सत्पुरूषाने देवीदास म्हणून संबोधिले.

एके दिवशी रात्रीच्या वेळी सर्व झोपी गेले. गाडगे महाराजांनी बारा वर्षे अज्ञातवासात काढली. नंतर आपले तन, मन, धन जनसेवेत वेचण्यासाठी, लोककल्याणासाठी त्यांनी कठोर तप आचरिले. या काळात गाडगे महाराजांनी कदान्न सेवन करून, चिंध्या पांघरून, मस्तकी गाडगे धारण करून देहश्रमाची पराकाष्ठा केली. लोक त्यांना गाडगे महाराज म्हणून आदराने हाक मारू लागले. लोकजीवन तेजाने उजाळण्यासाठी हाताच्या खराट्याने गावोगावी फिरून त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली. खेडोपाडी, शहरोशहरी जाऊन कीर्तन केली. शिक्षणाचे महत्त्व गाडगे महाराजांनी लोकांना पटवून दिले. साक्षरतेचा प्रचार केला. गाडगे महाराज

म्हणजे लोकजागृती साधणारे एक फिरते विद्यापीठ होते. संतांचे अभंग त्यांना तोंडपाठ होते. 'गोपाला, गोपाला देवकी नंदन गोपाला' असा गजर केल्यानंतर लगेच हरिपाठ म्हणत. गाडगे महाराज कीर्तन असले म्हणजे ते ऐकण्यासाठी लोक, लांबलांबून येत.

गाडगेमहाराजानी पंढरपूर, देहू, आळंदी, नाशिक, मुंबई येथे धर्मशाळा बांधल्या. जनकल्याणाची अनेक कामे त्यांनी यशस्वीरित्या राबविली. आपले जीवन त्यांनी विरागी व धर्मशील वृतीने व्यतीत केले. जाती, धर्म व वर्ण यांतील भेद त्यांच्याजवळ नव्हता. समतेचे ते पुरस्कर्ते होते. त्यांच्या अंत : करणात लोककल्याणाची जबरदस्त भावना होती. लोकांनी त्यांना संत समजून त्यांच्याविषयी भक्ति बाळगली. सामान्य लोकांसाठी त्यांनी खूप कार्य केले.

समाजातील अनेक कमालीचे अज्ञान, अनिष्ट चालीरीती व अंधश्रद्धा पाहून त्यांनी निरपेक्ष लोकसेवेचे व लोकशिक्षणाचे व्रत स्वीकारले. लहानपणापासूनच त्यांना भजन–कीर्तनांची आवड होती त्यांची वृत्तीही धार्मिक व परोपकारी होती. समाजसुधारणेसाठी, लोकशिक्षणासाठी त्यांनी कीर्तनाचे माध्यम प्रभावीपणे वापरली. निरक्षर असले तरी, त्यांची भाषा सुबोध व सर्वसामान्यांच्या हृदयाला जाऊन भिडणारी होती. महाराष्ट्रात सर्वत्र तसेच गुजरात, कर्नाटक व आंध्रप्रदेशाच्या काही भागात त्यांनी गावोगाव गोळा करून लोकजागृती केली. त्यांचा नैतिक उपदेश साक्षर व सर्वसामान्याना उपयुक्त ठरावा असाच होता.

'चोरी करू नये', कर्ज काढून चैन करू नये, दारू पिऊ नये, देवाला पशुचा बळी देऊ नये. अशी शिकवण अशा प्रकारचा उपदेश ते आपल्या कीर्तनांतून धार्मिक उदाहरणे देऊत करीत. पारंपरिक, परंपरागत विषयांसोबतच व्यावहारिक व नैतिक विषयांचाही त्यांनी आपल्या कीर्तनांतून लोकजागृतीसाठी चांगला उपयोग करून घेतला.

स्वच्छता, प्रामाणिकपणा व भूतदया यावर त्यांचा विशेष भर होता. तीर्थयात्रेच्या ठिकाणी ते जात; परंतु देवदर्शन न घेता मंदिराबाहेर थांबून यात्रेकरूची सेवा करीत व तेथील परिसर स्वच्छ हातांनी स्वच्छ करी. खाण्यापिण्याच्या बाबीतही त्यांचा साधेपणा होता. श्रीमंत भक्तांनी दिलेले चांगले अन्न ते भिकाऱ्यांना वाटून टाकीत आणि स्वत: गरीबाच्या घरची चटणी–भाकरी आणून खात.

लहाणपणापासूनच ते जातिपंथभेदातीत होते. जातिभेद नष्ट व्हावा, एकजिनसी समाज निर्माण व्हावा, असे त्यांना मनापासून वाटे या दृष्टीने यांचे आचरण आणि प्रयत्नही असत. पंढरपूर, त्र्यंबकेश्वर, आळंदी इ. ठिकाणी यात्रेकरूचे अत्यंत हाल होत. त्यांनी त्यांच्या सोयीसाठी प्रशस्त धर्मशाळा बांधल्या. विदर्भ ऋणमोचन येथे त्यांनी गोरक्षण संस्थाही उभारल्या. तसेच अनाथासाठी व अपंगासाठी अनेक प्रकारे कार्य केले. समाजसेवा करणाऱ्या अनेक संस्थानाही त्यांनी उदारहस्ते देगण्या दिल्या. अनेक ठिकाणी देव धर्माच्या नावावर चालणारी पशुहत्या त्यांनी नष्ट केली. अध्यात्माच्या जंजाळात न शिरताही संसारातच ईश्वरभक्ती करता येते, अशी साधी व सरळ शिकवण त्यांनी समाजास दिली.

'संत तुकाराम महाराज आमचे गुरू आहेत व माझा कोणीही गुरू नाही'. असे ते म्हणत. त्यांनी म्हटल्या प्रमाणे त्यांची गादी अथवा अर्थ कोठेही निर्माण झाला नाही. समाजात शिक्षणप्रसार करून अनेक शिक्षणसंस्थांना त्यांनी मदत केली. लोकांची त्यांच्यावर नितांत श्रद्धा होती; त्यामुळे लोकांनी त्यांना विपुल पैसा दिला. तो सर्व त्यांनी लोकोपयोगी कार्यासाठी वेचला. त्यांनी उभारलेल्या सर्वच संस्थांचा कारभार विविध मंडळेच पाहतात.

गाडगे महाराजांविषयी बहुजन समाजात

कमालीचा आदरभाव, त्यांनी महाराष्ट्रात केलेले विपुल लोकजागृतीचे व लोकसेवेचे कार्य अतिशय मोलाचे आहे. देव, देव करत लोकांचे प्रश्न सुटणार नाहीत. कर्मकांड लोकांना अधोगतीकडे नेते हे जाणलेल्या गाडगेबाबांनी विज्ञानवादी दृष्टिकोनाचा प्रसार आणि प्रचार करायला सुरूवात केली.

समाजाची प्रगती ही स्वच्छतेतून होईल, शिक्षणातून होईल. हरी हरी करून कोणतेही प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी लोकांना प्रयत्नवादी व्हावे लागेल. हे त्यांनी जाणले. ते फक्त विचार मांडणारे कीर्तनकार नव्हते, तर प्रत्यक्ष विचार आचरणात आणून नंतरच त्यावर भाष्य करणारे होते. खेड्यापाड्यातील गल्लोगल्ली स्वत: खराटा फिरवणारे होते. स्वच्छतेच्या मोहिमेचा उपयोग जातीजातीमधील भेदभाव नष्ट करण्यासाठीही त्यांनी केला. स्वच्छतेचे महत्त्व त्यांनी विदर्भापासून खानदेशापर्यंत, पश्चिम महाराष्ट्रापासून मुंबई कोकणापर्यंत कीर्तनाच्या माध्यमातून पोहोचवले. शिक्षण, सावकारी, देवस–नवस, पशुहत्या यासारखे विषय घेऊन मायबोलीत कीर्तनाद्वारे समाजप्रबोधन केले.

'अरे तुमी पंढरीले जाता, शेगावले जाता; पण तो तुमचा तितला देव बोलतो काय? तुमी जेवलं, पाणी पिलं, आसं तरी इचारतो काय? याही पुढे जाऊन ते कीर्तनातून म्हणतात.'असा कसा तुमचा देव? कुत्रं निवद खाते तर त्याला हाडं बी नाही मनत'. हे ऐकून काही लोकांना हसू यायचे, तर देव मानणाऱ्यांना राग यायचा. पण कीर्तनाला बाया, मुले, माणसे गर्दी करायचे. प्राध्यापक मा.म.देशमुख गाडगेबाबाबद्दल लिहितात,'गाडगेबाबांनी फक्त कपडे धुऊन, स्वच्छ केले नाहीत, तर भारतीय समाजाचे मनही स्वच्छ केले. ज्या गावात संत गाडगेबाबांचे कीर्तन असायचे त्या गावात जाऊन दिवसभर गल्ल्या स्वच्छ करून संध्याकाळी त्याच गावात कीर्तन करत असत कीर्तनात टाळ, मृदंग, खंजिरी असायची. एक उदाहरण संपले की 'गोपाला, गोपाला देवकीनंदन गोपाला' या धृवपदाचा कीर्तनात गाभा असायचा. बाब हे धृवपद हात उंच करून टाळ्या वाजवत तालात म्हणत. तसेच कीर्तन ऐकणाऱ्यांना त्याच तालावर म्हणायला सांगायचे.

मग दुसरा विषय घेऊन पुन्हा कीर्तनाला सुरूवात होई. ते ग्रामस्थांच्या अंधश्रदधेवर टीका करून मवाळ भाषेत कथाकथन करून श्रोते आपलेसे करायचे. त्यांची भाषा गावाकडची, वऱ्हाडी भाषा. त्यामुळे मले, तुले, बावा, लेकरू, पोरग असे शब्द ते कीर्तनात वापरत असत. त्यातला मर्म समजला की, लोक पोट धरून धरून हसून दाद दयायचे. असा हा स्वच्छतेचा पुजारी आधुनिक समाज सुधारक आज इथे उद्या तिथे. अंगावर फाटक्या चिंध्याचे कपडे व पाणी पिण्यासाठी गाडगे घेऊन, आज एका गावाला तर उदया दुसऱ्या गावाला, ना अन्नाची, ना जेवणाची, ना झोपण्याची फिकीर. जे मिळाले ते खायचे जेथे जागा मिळेल तेथे झोपायचे. त्यांना फक्त एकच ध्यास तो कीर्तनातून लोकजागृती करायची. त्यापायी त्यांनी उभ्या संसाराकडे पाठ फिरवली. त्यांनी कीर्तनातून समाज प्रबोधनाचे महान कार्य केले. हे कार्य ते आजीवन करीत राहीले.

संत गाडगे बाबा यांनी लोकशिक्षणाचे कार्य विदर्भातील ऋणमोचन या गावापासून सुरू केले. १९०८ मध्ये पूर्णा नदीवरील घाट स्वधर्मीयांसाठी जातीसाठी खुला केला. १९२५ ला मूर्तिजापूर येथे गोरक्षण धर्मशाळा व विद्यालय स्थापन केले. १९२७ ला पंढरपूर येथे चोखामेळा धर्मशाळा सुरू केली. गुरू शिष्याची परंपरा त्यांना मान्य नव्हती. शिष्य गुरूना मंदिरामध्ये बसवून त्यांची पूजा करतो. याची त्यांना चीड होती म्हणून ते म्हणायचे 'मी कुणाचा गुरू नाही, अन माझा कुणी शिष्य नाही. ते संप्रदायाच्या विरोधात होते. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व

जाणले म्हणून आठ फेब्रुवारी १९५२ रोजी श्री गाडगेबाबा मिशन स्थापन केले. त्याद्वारे त्यांनी महाराष्ट्रभर शिक्षणसंस्था व अनाथ, अपंग यांच्या पुनर्वसनासाठी त्र्यंबकेश्वर, आळंदी, पंढरपूर इ. ठिकाणी धर्मशाळा स्थापन केल्या.

आचार्य अत्रे गाडगेबाबाबददल आदराने एका ठिकाणी म्हणतात, 'सिंहाला पाहावे वनात, हत्तीला पाहावे रानात तर गाडगेबाबांना पाहावे कीर्तनात'. १९३१ ला वरवंडे येथे संत गाडगे बाबांच्या प्रबोधनाने पशुहत्या बंद झाली. १९५४ मध्ये जे.जे.रूग्णालय परिसरात त्यांनी धर्मशाळा बांधली. बाबांनी डॉ.पंजाबराव देशमुख यांना शिक्षण संस्थाद्वारे शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांच्या कार्यात मदत केली. भारतरत्न डॉ.बाबासाहेबांची संत गाडगेबाबांशी मुंबईला भेट झाली. पंढरपूरची चोखामेळा धर्मशाळा संत गाडगेबाबांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अर्पण केली होती. या आधुनिक विज्ञानवादी संताचा डॉ.आंबेडकर आदर करीत. त्यांना ते गुरूसमान मानीत.

संत गाडगेबाबांनी आताच्या तथाकथित बाबा लोकांसारखी अफाट संपत्ती जमवली नाही. स्वत:च्या मालमत्तेचा अधिकार दिला नाही. या प्रकारचा त्याग असामान्य आणि महान कर्मयोगीच करू शकतात. संत गाडगेबाबांनी त्यांच्या कार्यासाठी कुणासमोर मदतीसाठी हात पसरला नाही. त्यांनी कीर्तनातून विज्ञानवादी लोकजागृती, लोकप्रबोधनाचे कार्य अखेरच्या श्वासापर्यंत केले.

संत गाडगेबाबांनी खरा रोकडा धर्म सांगितला त्या धर्माचा दहा कलमी कार्यक्रम समाजापुढे ठेवला. भुकेल्यांना अन्न, लहान लेकरांना अन्न, वस्ती नसणाऱ्यांना वस्ती, गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण, घर नसणाऱ्यांना घराचा निवारा, आसरा काम नसणाऱ्यांना कामधंदा, रोजगार, अधं अपंग रूग्णाना औषधे, भुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरूण-तरूणींचे लग्न जमवून देणे. दु:खी निराश असणाऱ्यांना हिंमत देऊन जगण्याचे बळ देणे इत्यादी त्यांचे विचार आजही सामाजिक न्यायाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

एकदा मुंबईच्या आयखळा मार्केटमध्ये गाडगेबाबांचे कीर्तन होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या सहकाऱ्यांसोबत कीर्तनाला गेले. कीर्तन सुरू होताच श्रोत्यांपैंकी एकाने त्यांना विचारले,'महाराज एक इचारू का? त्यावर गाडगेबाबा म्हणाले, 'इचारा मायबाप. पण मले महाराज मनू नका. मी आपले लेकरू हाय बोलविते धनीच बसलेत तुमच्या पलीकडे.' असे म्हणून त्यांनी बाबासाहेबांकडे बोट दाखवले. डॉ. आंबेडकर चक्क जमिनीवर बसून कीर्तन ऐकत होते.

लोकसंत, कर्मयोगी, वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबांनी ग्रामस्वच्छता अभियान सुरू केले. कीर्तनाद्वारे अंधश्रद्धा, समाजातील वाईट चालीरिती, शिक्षणाचे महत्त्व, शेतकऱ्यांची सावकाराद्वारे होणारी जागृत केले. विज्ञानवादी दृष्टिकोन दिला. त्यांनी दिलेल्या राबविलेल्या कार्यक्रमाचा आदर्श ठेवून महाराष्ट्र सरकार तर्फे ग्रामस्वच्छता मोहीम, सामाजिक न्यायाच्या योजना चालवल्या जात आहेत. त्या महान कर्मयोगी संताला त्यांच्या अभिवादन करते.

धन्यवाद !

**कु. दिशा खेकडे**
बी.एस.सी. प्रथम

# महात्मा जोतिबा फुले यांचे शेतकरी उद्धाराचे कार्य



जोतिबा गोविंदराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२६ रोजी झाला. वडील गोविंदराव हे माळीकाम करत फुले यांचे मूळ गाव हे सातारा जिल्हातील कटगुण काही कारणामुळे त्यांचे पूर्वज गाव सोडून पुणे जिल्हात आले. १८३४ ते १८३८ या काळात जोतिबांचे पंतोजीच्या शाळेत शिक्षण झाले. १८४० साली जोतिरावांचा विवाह सावित्रीबाईशी झाला. १८४१ ते १८४६ या काळात पुण्यात मिशनरी शाळेत माध्यमिक (इंग्रजी) शिक्षण पूर्ण केले. त्याच काळात लहुजी साळवेच्या तालमीत त्यांनी अंगमेहनत केली. लहुजी वस्ताद यांच्या शिष्यांमध्ये जोतिबा फुले, बाळ गंगाधर टिळक, वासुदेव बळवंत फडके या तिघांचा समावेश होतो. या तिघांनी भारतीय समाजजीवनाला आणि राजकारणाला आपापल्या परीने आकार दिला आहे. जोतिबा, 'लहुजी उस्तादाकडून विविध प्रकारचे व्यायाम शिकले आणि देशभक्तीही शिकले आणि समाजभानही ज्योतिबा फुले म्हणतात की, शेतकऱ्यांचे मुलाच्या मागणीच्या वेळी ब्राम्हण जोशी हातात पंचांगे घेऊन त्यांचे घरी जातात. व आपल्यापुढे राशीचक्रे मांडून त्यांस मुलीमुलांची नांवे विचारून मनांत स्वहित संकल्प धरून मोठ्या डौलाने आंगठ्यांची अग्रे बोटाचे कांड्यावर नाचवून भला एकादा अनिष्ट ग्रह त्यांचे राशील जुळवुन त्या ग्रहाचे शमनार्थ जपानुष्ठानाच्या स्थापने करिता व त्यांच्या सोयीकरिता काही द्रव्या शेतकऱ्यापासून घेतात.

त्याचे भय मनी ।। धरा सर्प<br>
न्यायाने वस्तूंचा उपयोग<br>
आनंद करावा ।। भांडू नये

आपल्या सरकारास अक्षरशून्य अज्ञान शूद्र शेतकऱ्याचे निकस झालेल्या शेतांची सुधारणा करण्याविषयी उपाय सुचवितो ते आमच्या दयाळू सरकारने एकंदर सर्प शेतकऱ्यांस युरोपीयन शेतकऱ्यांसारखे विद्याज्ञान देऊन, त्यांस त्यांसारखी यंत्रद्वारे शेती कामे करण्यापुराती समज येईतो पापेतो एकंदर सर्व गोऱ्या लोकांसह मुसलमान वगैरे लोकांनी हिंदुस्थानांतील तूर्त गायाबैलासह त्यांची वासरे कापूस खाण्याचे ऐवजी त्यांनी येथील शेळयाबकरी मारून खावीत अथवा परमुलखांतील गायाबैल वगैरे खरेदी करून येथे आणून मारून खावे. म्हणून कायदा करून आमलात आणल्याशिवाय, येथील शुद्र शेतकऱ्यांजवळ बैलांचा पुरवठा होऊन त्यांना आपल्या शेतांची मशागत भरपूर करता येणार नाही व त्यांजवळ शेणखताच्या पुरवठा होऊन त्यांचा व सरकारचा फायदा होणे नाही. एकंदर डोंगर पर्वतांवरील गवत झाडाच्या पानफुलांचे व मेलेच्या कीटकश्वापदांच्या मांसहाडांचे कुजलेले सत्व, वळपाच्या पावसाने व धुपून पाण्याच्या पुराबरोबर वाहून ओढ्याखोड्यांत वायां जाऊं नये.

''दरिद्री मुलांनी विधेस शिकावे<br>
भिक्षान्न मागावे ।। पोटापुर्ते<br>
विद्वान वृध्दांनी विद्यादान द्यावे<br>
भिक्षेकरी व्हावे ।। गावांमध्ये''

महात्मा ज्योतिबा फुले म्हणतात सरकार असे सुखस्वप्न बाळगत आहे की हे वरीष्ठ वर्गातील लोक कनिष्ठ वर्गातील लोक शिक्षणप्रसार करतील हे सुखस्वप्न कराशी बाळगून गरीब शेतकऱ्याकडून

सरकार जो सारा गोळा करते त्या सर्व वसुलीचे उत्पन्न सरकार वरिष्ठ लोकांच्या शिक्षणावर उधळते. विद्यापीठ श्रीमंतांच्या मुलांना शिक्षण देतात आणि त्यांची ऐहिक उन्नती साधण्यासाठी साहाय्य करतात परंतु त्या विद्यापीठातून निघालेल्या सुशिक्षितांनी आपल्या देशबांधवांच्या उन्नतीच्या कार्यात काहीही भर घातली नाही. मुंबई शहरात प्राथमिक शिक्षणाची खूप आबाळ झाली आहे.

''क्रोधाचा विटाळ सत्यधर्म पाळी
तो खरा बळी मानवात
सर्वभूती दया हृदची कोमला
घालीती अगळ इंद्रियांस''

शेतकऱ्याकडून सरकार सारा घेते त्याचा अर्धा भाग केवळ प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा. प्राथमिक शाळांना योग्य ती उपकरणे पुरवण्यात येतड नाहीत. सरकार शिक्षणासाठी खर्च कर घेते, आणि तो पैसा ज्या कामासाठी खर्च होत नाही, याविषयी दु:ख वाटते. या प्रांतातील जवळजवळ १० लाख मुलांच्या प्राथमिक शिक्षणाची काहीच सोय केलेली नाही असे म्हणतात त्याचबरोबर दारिद्र्य त्यांच्या ढायी असलेल्या स्वावलंबनाचा अभाव आणि सुशिक्षित नि बुध्दिमान वर्गावर सर्वस्वी अवलंबून राहण्याची त्यांची सवय त्याला कारण शेतकऱ्यामध्ये शिक्षणाची दु:स्थिती होय. माझे असे म्हणने आहे, की जनतेमध्ये प्राथमिक शिक्षण काही वयोमर्यादेपर्यत सक्तीचे करावे. निदान बारा वर्ष वयोमयोदापर्यंत ते करावे. महार, मांग आणि दुसऱ्या अतिशूद्र जाती त्यांना तर जातिभेदाच्या दुषित पूर्वग्रहांमुळे शाळामधून जवळ - जवळ वगळण्यात आले आहे वरिष्ठ वर्गातील मुलांच्या शेजारी त्यांना बसविण्यात येत नाही म्हणून त्यांच्यासाठी सरकारने वेगळ्या शाळा काढयाल्या परंतु त्या फक्त मोठ्या शहरातून आहेत.

''जगात वर्तती सदगुणी मवाळ
वासनेस मूळ ।। डाग नाही
सत्यशील होता, धिक्कारी तो कवी
तोच सत्यावादी जोती म्हणे ।।

महात्मा ज्योतीबा फुले म्हणतात की उतारावरील शेतांना तालीवजा बंधारे काळे - गोरे लष्कर व पोलीस खात्यातील फालतू शिपायांकडून बांधून घ्यावेत. गायी व बैल यांची पैदास वाढविण्यासाठी कामाचे गायी/बैल कापून खाऊ नयेत त्यांना न मारण्याचा कायदा करावा. शेतकऱ्यांचे प्रश्न असे तीन टप्पे करता येतात. शेतकरी हा अन्नदाता आहे. तरीही उपेक्षेचा धनी आहे. त्यांचे सर्व स्तरातून अडवणूक आणि शोषण होते हे शतकातुशतके चाललेले रहा गाडगे आहे त्यात आजही फारसा फरक पडला आहे असे नाही. १८८३ साली शेतकऱ्यांचा आसूळ हा ग्रंथ लिहून महात्मा फुलेनी शेतकऱ्याने दु:ख आणि दैन्य चव्हाट्यावर मांडले केवळ दु:ख, दैन्य मांडून ज्योतिबाराव थांबले नाहीत तर त्यांची परिस्थिती सुधारावी म्हणून काही मूलभूत स्वरूपाच्या सूचनाही केल्या सरकार आणि शेतकरी यांच्यामध्ये सरकारी नोकर हा दुवा झाला पाहिजे. आणि त्यासाठी शुद्र शेतकऱ्यांशी बंधिलकी असणारा त्यांच्या हाडामासांला व स्वत: कष्ट करीत असणारा नौकरवर्ग तयार व्हावा असे त्यांचे मत होते.

कु. गायत्री आंबटकर
बी.एस.सी. प्रथम

# आयुष्य

आयुष्य लहान नसतं
आपण जगायला उशिरा सुरूवात करतो
हसून खेळून जगा कारण उद्या
काय होईल कोणालाच माहीत नाही
सदैव सुखी राहण्यासाठी दुसऱ्याकडून
अपेक्षा करणं सोडून दया.....!
अरे दुनिया नाव ठेवण्यात
व्यस्त असते, तुम्ही नाव
कमवण्यात व्यस्त रहा
ह्या जगात प्रत्येकावर
विश्वास ठेवणे अतिशय धोकादायक आहे.
ज्यांनी तुम्हाला अडचणीत आणले,
अशाना कधीच विसरू नका.....!
दुसऱ्याला संपवण्याच्या नादात कधीकधी
स्वत:ची वाट लागू शकते......
ज्याला तुम्ही वाऱ्यापासून
वाचवता त्याच दिव्याने
कधी - कधी हात भाजतो.
जो दुसऱ्याला आधार
देतो त्याला कोणाचाच
आधार मिळत नाही.....!
ज्या घावातून रक्त निघत नाही
समजून जा तो वार कोणी तरी
आपल्यानेच केला आहे.....!
लोकांना डोक्यावर
घेऊ नका मान लचकेल.
राग हा योग्य वेळी
यायलाच पाहिजे
नाहीतर लोक राग न
येण्याचा फायदा घेतात.....!
तुम्ही यशाच्या रेषेला टच
करताच लोक तुमचे पाय
खेचायला सुरूवात करतात.
खूप अवघड आहे त्याला पाडणं
जो धक्के खाऊन वर आलाय
अरे,....................!
स्वत:च स्वत : बघा लोक तर
देवातपण चुका काढतात.
सुखासाठी कोणासमोर
हात जोडू नका
वेळ वाया जाईल.....
ही दुनिया मतलबी झालीय
त्यापेक्षा दु:खाचा सामना करा
चांगली वेळ येईल......!
जेव्हा लोक तुमच्या मागे
बोलतात तेव्हा समजून
घ्यावं की, तुम्ही त्यांच्या
दोन पाऊले पुढे आहात.....!
चांगले कर्म केले की
विरोधक तयार करण्यासाठी
मारामारी करावी लागत नाही.
ह्या जगात कोणत्याही
कार्याला मदत करणाऱ्यापेक्षा
पाय खेचण्याऱ्याची संख्या जास्त आहे.
चांगल्या रस्त्याला गतिरोधक
आणि चांगल्या व्यक्तिला
विरोधक हे असतातच
चांगल्या कामाला प्रत्येकवेळी
मांजरांपेक्षा माणसेच
जास्त आडवी येतात.....
नको असलेल्या अपेक्षा
वाढल्या की हवी असणारी
माणसं गमावण्याची वेळ येते.....!
कधीही मिठासारखे आयुष्य
जगु नका, की लोक तुमचा
चवीनुसार गरजेपुरता
वापर करून घेतील.....!
स्वत: ला कधी उद्ध्वस्त
होऊ देऊ नका, कारण
लोक ढासाळलेल्या घराच्या
वीटा सुध्दा सोडत नाही.....!
गरज संपली की लोकांचे
रंग पटकन बदलतात.
स्वार्थाशिवाय मैत्री नाही
हे जगातील सर्वांत मोठे
कटू सत्य आहे.....!
समुद्रातील तुफानापेक्षा
कधी - कधी मनातील वादळे
अधिक भयानक असतात
आयुष्यात कितीही चांगले
कर्म करा, कौतुक हे फक्त
स्मशानातंच होतं.....!
ज्यांनी जिंकायला शिकवले
त्यांना हरवण्याची स्वप्न
कधीच पाहू नका.....!
चर्चा आणि आरोप हे फक्त
यशस्वी माणसाच्याच
नशिबी असतात.....!
जिंकायची क्षमता इतकी
ठेवा की आपल्याला
हरवण्यासाठी प्रयत्न नव्हे
तर कट रचले गेले पाहिजेत.

**कु. मयुरी नौकरकर**
बी.एस.सी. प्रथम

# महात्मा ज्योतीराव फुले यांचे शेतकऱ्याविषयी कार्य...



महात्मा जोतीराव फुले यांच्या निधनाला आज १२५ वर्षे झाली. त्यांच्या काळात त्यांनी केलेले काम महत्वाचे असेल ही, परंतु आज त्याचा काय उपयोग? किती वर्ष आम्ही केवळ आरत्याच ओवाळायच्या? संभाजी ब्रिगेड, बामसेफ यासारख्या स्वत:ला फुले- आंबेडकरवादी म्हणून घेणाऱ्या संघटना फुले ब्राम्हण – द्वेष्टे होतो. असा सरसकट प्रचार करीत असतात. काही चतुर राजकारणी नीत्यनेमाने फुले आंबेडकराचा महाराष्ट्र असा जयघोष करून जातिच्या मतव्यांका मजबुत करीत असतात. संभाजी भीडे, सनातनचे जयंत आठवले, सोबतचे बाळ गांगल आदी लोक तर फुले राष्ट्र विरोधी होते असे सांगत, लिहीत असतात, खरेच फुले होते तरी नेमके कोण?

जोतीराव प्रगतशील शेतकरी होते. शेतीमालाला उत्पादन खर्च भरून येईल आणि किमान १५ ते २० टक्के नफा मिळेल एवढा बाजार भाव मिळाला पाहिजे, शेतकऱ्यांना पिंकासाठी पुरेसे आणि बारमाही पाणी सिंचनासाठी मिळाले पाहिजे, ते वाया जाऊ नये म्हणून नळाद्वारे देण्यात यावे, आधुनिक पद्धतीच्या शेतीचा अभ्यास करण्यासाठी शेतकऱ्यांना सरकारने परदेशात पाठवावे यासारखा त्यांनी 'शेतकऱ्यांचा असुड' या ग्रंथात १८८३ साली केलेल्या सुचना आजही मार्गदर्शक आहे. शेतकरी सुखी व्हायचा असेल तर त्याची त्रीसूत्री फुले मांडून दाखवतात.

१) उत्पादन खर्चावर आधारित बाजारभाव शेती मालाला मिळाला पाहिजे.

२) शेती आधुनिक पद्धतीनेच केली पाहिजे. शेतीला नळाद्ववारे (ठिबक सिंचनाचे बीजरूप) पाणी पुरवठा केला पाहिजे. त्यासाठी धरणे, विहीर, तलाव, नळी, बांधली पाहिजे, कायम स्वरूपी सिंचन सुविधा हवी, नैसर्गिक खते आणि संकरीत बियाने वापरली पाहिजे.

३) शेतीधंदयाला उदयोग, व्यापाराची जोड दिली पाहिजे. दुध, अंडी, लोकर असे एक पुरक उदयोग सुरू केले पाहिजेत. शेतकऱ्याबरोबरच शेतकऱ्यांनी उदयोग व व्यापारात उडी घेतली पाहिजे. एकटी शेती कधीच परवडत नसते. 'शेतकऱ्याचा असुड' या पुस्तकात जोतीरावांनी शेती विकासाचे संकल्प चित्र रेखाटले. व्यापारी पिके, कॅनलचे पाणी आणि आधुनिक पिक पद्धती याचा आश्रय घेणे कसे गरजेचे आहे ते पटवून देतात. शेतकरी सुखी व्हायचा असेल धरणे, विहीर, तलाव, तळी बांधली पाहिजेत, कायमस्वरूपी सिंचन सुविधा हवी नैसर्गिक खते आणि संकरीत बियाने वापरली पाहिजेत. शेती धंदयाला या घरातून त्यांनी उदयोजक, व्यापारी आणि व्यवसायिक क्षेत्रातील लक्षणीय कामगिरी केली. शेती परवडत नाही म्हणून आजवर देशातील लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहे. १३० वर्षापुर्वी त्यांनी शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित बाजार भाव मिळाल्या शिवाय शेती आणि शेतकरी यांचे दैन्य संपणार नाही असे ''शेतकऱ्यांच्या असूड'' मध्ये सांगुन या समस्येकडे देशाचे लक्ष बेधले होते. आधुनिक पद्धतीची शेती करणे, तलाव, तळी, धरणे बांधून

शेतीला ''नळाद्वारे पाण्याचा पुरवठा करणे, शेताला जोडधंदे, पुरक उदयोग यातून शेती किफायनशीर बनविण्याचा नकाशा त्यांनी माडून दाखविला होता.

एक अव्वल दर्जाचे यशस्वी उदयोगपती आणि नामवंत शेतकरी म्हणून जोतीरावाचा नावलौकिक होता. जोतीरावाच्या उदयोगपती, कार्यकारी संचालक, अर्थतज्ञ आणि शेअर मार्केट विषयक योगदानाकडे जाणकाराचे अदयाप पुरेशे लक्ष गेलेले नाही. जोतीराव हे स्वत:च्या तेलाने जळणारे सामाजिक कार्यकर्ते होते. वर्गणीवर समाजकार्य करण्याची प्रथा तोवर निर्माण झालेली नव्हती. स्वकष्टार्जीत संपत्ती खर्चुन त्यांनी समाज कार्य केले. 'बिल्डर' हा शब्द आज वेगळ्या अर्थाने प्रचलित झालेला आहे. याला 'आदर्श रूप' प्राप्त झाल्याने तो वापरताना काळजी घ्यावी लागते. जोतीराव हे मुलत: एक 'नेशन बिल्डर' होते.

'ज्ञान ही एक शक्ती आहे ' अशी ठाम श्रदधा बाळगणाऱ्या जोतीरावांनी आपल्या या संवधीच्या विचाराचा सारांश सुत्रबद्ध पद्धतीने असा सांगितला आहे.

''विदयेविना मति गेली ।
मतिविना नीती गेली ।।
नीतीविना गती गेली ।
गतीविना वित्त गेले ।।
इतके अनर्थ एका अविदयेने केले.''

कु. प्रतिक्षा डफ
बी.एस.सी. प्रथम

# एक दिवा.....

*एक दिवा लावतोय दिवाळीच्या सनासाठी*
*वर्षभराच्या त्रासानंतर उत्साहित झालेल्या*
*मनासाठी.....!*
*एक दिवा लावतोय घराला उजळण्यासाठी*
*कोपऱ्या - कोपऱ्यात राहिलेल्या अंधाराला*
*घालविण्यासाठी.....!*
*एक दिवा लावतोय लक्ष्मीच्या उपासनेसाठी*
*सरस्वतीला घेवून घरात नांदावे तिने ह्याच*
*एका हट्टासाठी.....!*
*एक दिवा लावतोय स्वत:ला बघण्यासाठी*
*काय ? काय ? आणि कसे मिळविले*
*प्रामाणिकपणे तपासण्यासाठी.....!*
*एक दिवा लावतोय भुतकाळाला जाळण्यासाठी*
*चांगले - वाईट सारे काही काळ*
*टाकण्यासाठी.....!*
*एक दिवा लावतोय आपल्याना बांधण्यासाठी*
*बरोबर नाही त्यांना ही ज्योतितून*
*भेटण्यासाठी.....!*
*एक दिवा लावतोय भांडणाना मिटविण्यासाठी*
*समज गैरसमजाने दूर-दूर*
*झालेल्यासाठी.....!*
*एक दिवा लावतोय नकळत सूचणाऱ्या शब्दासाठी*
*'प्रत्यक्षात जय व्यक्तच करता येत नाही अशा अनेक*
*भावनांसाठी.....!*

कु. स्नेहा वर्भे
बी.एस.सी. प्रथम

# स्वच्छतेचे जनक गाडगेबाबा



संत गाडगे महाराजाचा जन्म फेब्रुवारी १८७६ रोजी प्रांतीय महाराष्ट्र, जिल्हा- अमरावती, तहसील अजानगाव-सुर्जी, ४० - दरयापूर (एससी) विधानसभा क्षेत्रातील ग्राम - शेन्दगाव येथे पिता झिंगराजी जाणोरकर आणि माता सखुबाई यांचे घरी झाला. गाडगे बाबांचे पूर्ण नाव ''देवीदास डेबूजी झिंगराजी जानोरकर'' घरात त्यांच्या पालकांना त्यांना प्रेम होते. 'डेबूजी म्हणतात

डिबूजी नेहमी व आपल्याबरोबर मातीचे मटके सारखे एक पात्र ठेवतात त्यामध्ये ते जेवन करत आणि पाणी देखील पीत होते. एक लाकड आणि मातीचे भांडे ज्याला गागा म्हणतात (लोटा), म्हणूनच काही लोक त्यांना गाडगे महाराज म्हणत असत.

काही लोक त्यांना गाडगे बाबा म्हणतात आणि नंतर ते प्रसिध्द झाले म्हणून ''संत गाडगे गाडगेबाबा यांचे लहानपण त्यांचे मामा त्यांचे येथे ग्राम-दापुर, तहसील आणि ३२ मुर्तीजपूर (एससी) विधानसभा क्षेत्र, जिल्हा - अकोला मध्ये गेला कारण देवबूजी यांचे वय आठ वर्षाचे होते. तेव्हा त्यांच्या वडिलांनी स्वर्ग सीधारित केले होते, म्हणून त्यांच्या माताजींनी त्यांना घेतले आपल्या वडिलांचे घरी येत होते. अकोला आणि अमरावती दोन्ही जिल्हे आणि अंजानगांव सुर्जी आणि मुर्तिजापूर दोन्ही तहसील जवळच आहेत. दापुर गावचे थानाजी खल्लारकरची मुलगी कुंटाबाई त्याच्यावरोबर लग्न झाले. त्या लोकांबरोबर धार्मिक, सामाजिक संस्कार होते, तर त्यांना समस्यांसारखेच समस्या येत असे.

आता त्यांना वाटले की आपल्या समाजासाठी काही काम करावे लागेल. हे दुखणे आपल्यासाठी असेल, तर त्याचा उपचारही आपण करणार नाही पण कुटुंबाचे जबाबदारी त्याच्या कंधे वर येत असल्यामुळे ते त्याही विचार करीत राहतात आणि अखेरीज त्यांनी गौतम बुध्द सारखे २९ वर्षाच्या आयुष्यात घर - परिवार सोडले.

एका हाती लाठी दुसऱ्या हाती भिक्षा पात्र आणि शरीर वर फाटलेल्या जुन्या कपडयांना गठ्ठ करणे, चीवरसारखी बनावट वेश कर जेव्हा ते एखादया गावात प्रवेश करतात तेव्हा ते लगेचच गटर आणि मार्गांना स्वच्छ करतात आणि काम भीती देते आणि मग संध्याकाळी तिथेही कीर्तन आयोजित होते गावाचे लोक त्यांना पैसे देतात आणि बाबाजी ते पैसे वापरतात सामाजिक व शारीरिक विकास करणे. अशा प्रकारे त्यांचे अनुयायींची संख्या वेगाने वाढली लोक त्यांचे सह जन सेवामध्ये जमणे सुरू होते. त्यांनी यात्रियोंच्या सुविधासाठी कुए आणि तलावांची निर्मिती केली. रूग्णासाठी रूग्णालये आणि रोगीसाठी आश्रम तयार करणे. संत गाडगे मंदिर आणि मूर्तिपूजचे विरोधक होते. त्यांनी शिक्षण विकासासाठी अनेक आश्रम उघडले. गाडगे बाबा ने ब्राम्हण, साधु, संत, पांडितो, महंतो, धार्मिक

पाखंड, तार्किक ज्ञान से धज्जिया उडाली. ते स्वत:च्या बद्दल सांगातात की ''मी कोणाचे ही शिष्य नाही आणि मी कोणाचेही गुरूदेखील नाही, सर्व स्वंय शिष्य आहेत आणि स्वंयचे गुरू आहेत. ज्या ज्या कथित धार्मिक स्थळावर बकऱ्या, मुंगे, म्हैस कापत होते बाबा त्यातून बाहेर पडले आणि 'जीवदान' नामक संस्थांची स्थापना सुरू झाली. त्या मंदिर मूर्तिच्याऐवजी जन कल्याण, समाज व विकास शिक्षणासाठी विद्या मंदिरामध्ये विश्वास होता. ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म, ब्रम्हधर्म इत्यादी बेकार बातमीवर त्यांनी विश्वास ठेवला नाही बाबा यांच्या प्रमुख अनुयायांनी संस्था स्थापन केल्यामुळे अनुशासन बनुन ठेवले आणि बाबाचे मिशनने तीव्रगतीपासून सगळी कडे काम पसरवण्याचे उद्दीष्ट केले. ०८ फेब्रुवारी १९५२ रोजी गाडगे मिशन सुरू केले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ने बाबाकी सर्व संस्थाचे एक ट्रस्ट बनविले, यात जवळपास ६० संस्था आहेत आजही हे मिशन जनसेवा समर्पित आहे. ते सदैव बाल विवाह, विधवाचे मुंडन, कुप्रथास थांबविणे, प्रयासरत राहतात, ते आपल्या कीर्तनामध्ये म्हणतात. की उंच -नीच, अमीर-गरीब, काळ्या - गोरे सगळ्या माणसाच्या विचारांची नतीजा आहे, म्हणूनच आपल्याला सामाजिक ढांचेमध्ये बदल करणे आवश्यक आहे. जेणेकरून मानवताचे विकास शक्य होईल. ते शिक्षणासाठी माणसाची अनिवार्य आवश्यकता होती. आपल्या कीर्तनांच्या माध्यमाने शिक्षण महत्त्वाचे वर पर प्रकाश टाकताना ते म्हणतात ते म्हणतात ''शिक्षणाची मोठी गोष्ट आहे. पैसे कीची तंगी झाली तर खाली भांडे विका महिलासाठी कमी किंमतीचे कपडे खरीदी करा बाबा-विठ्ठल मकानमध्ये राहतात पण मुले शिक्षणास दिलेले नसतात. बाबाच्या स्थापनेच्या जवळजवळ ६० संस्थामध्ये त्यांचे अनुयायी यांनी सुमारे ४२ संस्था निर्माण केल्या. त्यांनी काही मंदिर निर्माण केले नाही, दीनहीन अपेक्षित व साधनहीन मानवता बहुतांश आजार हे अशुध्द पाणी, अस्वच्छ परिसर आणि वैयक्तिक स्वच्छतेचा अभाव यामुळे होतात हे लक्षात घेऊन संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यास सुरूवात केली.

प्रचंड लोकसहभागाने या चळवळीला लोकचळवळीचे रूप दिले एवढे नाही तर कोट्यावधी रूपयांची विकास कामे ही लोकसहभागातून करण्यात आले. शुध्द आणि सुरक्षित पिण्याचे पाणी, घराची स्वच्छ आणि अन्न काळजी, वैयक्तिक स्वच्छता परिसर स्वच्छता सांडपाण्याचे नियोजन आणि घनकचऱ्याचे व्यवस्थापन मानवी मल-मूत्राचा विल्हेवाट यासारख्या विभागात काम करून गावांनी अतिशय उत्स्फुर्तपणे ग्रामविकासाचा पाया मजबूत केला.

गावातील विद्यार्थी असो की अंगणवाडी सेविका-मदतनीस सरपंच असो की महिला भगिनी सर्वांनी या योजनेत भरीव योगदान तर दिलेच परंतु गावाच्या सामाजिक तसेच आर्थिक विकासाला गती ही दिली स्वखुषीने स्वच्छता दूत म्हणून काम करणाऱ्या या सर्व लोकांनी गावागावात स्वच्छतेची ग्राममधून निर्माण केली आणि आरोग्यसंपन्न आणि सुदृढ आरोग्याचा पाया रोवला.

**कु. स्नेहा यादव**
बी.एस.सी. प्रथम

# कर्तृत्व

नशीबाने साथ सोडली म्हणून
मरायचे नसते,
स्वत:च्या हिंमतीवर
जगायचे असते,
मागचे सारे काही आठवुन
रडायचे नसते,
भविष्याचा विचार करून
जगायचे असते,
क्षुल्लक संकटांना
घाबरायचे नसते,
एक ठेच लागली म्हणून
थांबायचे नसते,
धैर्याने त्याच वाटेने
चालायचे असते,
कर्तृत्वातुनच माणूस घडतो
हे लक्षात ठेवायचे असते.

कु. उनेषा गवळी
बी.एस.सी. प्रथम

# मी एक प्रश्न विचारू का ?

खरंच मराठी भाषेचे भवितव्य
आज टिकून आहे का?
मराठी भाषेचे भवितव्य टिकून
राहण्यासाठी प्रयत्न कराल का?
मराठी महाराष्ट्राची भाषा
संवादाची दिशा आणि भाषा
तरी पण, लहाणस्या मुलापासून
तर म्हाताऱ्या मानसापर्यंत सर्वजन
इंग्रजीमध्ये बोलण्याचा प्रयत्न करतात का?
मराठी भाषा असते तुमच्या
मनामनात,
मराठी भाषा असते तुमच्या संवादात,
तरी पण, मराठी भाषेचे अस्तित्व
टिकून राहण्यासाठी शाळेमध्ये
विविध उपक्रम राबवावे लागतात
आठवा मराठी भाषेला शब्दाशब्दात
साठवा मराठी भाषेला पानापानात
तरी पण, मराठी भाषेवर इंग्रजी
भाषेतील शब्दाचे वर्चस्व प्रस्थापित झाले का?
एवढेच नव्हे तर आज
मराठी भाषेतील शाळेवर सुद्धा
इंग्रजी भाषेतील शाळेचे वर्चस्व
प्रस्थापित झाले आहे
इंग्रजी भाषा आणि तंत्रज्ञान ही काळाची
गरज आहे ते आम्हाला माहीत आहे
पण इंग्रजी शाळेमध्ये मराठी भाषा
वापरली सुद्धा जात नाही का?
शेवटी एवढेच सांगते
सदा ठेवा मराठी भाषेला जिवंत
करू नका मराठी भाषेचा अंत
करू नका मराठी भाषेची उपेक्षा
हिच माझी अपेक्षा

कु. वैष्णवी भोपळे
बी.एस.सी. प्रथम

# प्रेम

उगीचंच वाटेकटे पाहायचं नसतं
हृदय मात्र धडधडत असतं
मनातल्या मनात झुरायचं असतं
याचंच नाव प्रेम असतं.
सोनेरी स्वप्न पाहायची असतात
वाटेवरती तिच्या उभे राहायचं असतं
यायचं नाव प्रेम असतं
स्व:त शीत बोलायचं असतं
स्वत:च स्वत:ला सावरायचं
मन मात्र थाऱ्यावर नसतं
याचंच नाव प्रेम असतं
विट्यासाठी रडायचं असतं
रडतांनाही हसायचं असतं
हिंमती अश्रुनाही कधी सोडायचं नसतं
याचंच नाव प्रेम असतं

कु. प्रणाली वरघने
बी.एस.सी. प्रथम

# जगावे कोणासाठी

जगावे कोणासाठी
जिने आपल्याला जन्म दिला
तिच्यासाठी की,
ज्या पित्याने आपले पालन
पोषन केले त्याच्यासाठी

जगावे कोणासाठी
भावाच्या प्रेमासाठी, की बहिणीच्या
मायेसाठी
जगावे कोणासाठी
मैत्री केलेल्या मित्रासाठी की
संगत केलेल्या मैत्रिणीसाठी
जगावे कोणासाठी
जगावे प्रेमासाठी की प्रेमाच्या
वेलीसाठी, पण कोणी नाही
कोणासाठी
जग
हे स्वार्थां
साठी........

कु. पायल सोनकुसरे
बी.एस.सी. प्रथम

# मैत्री

कधी आठवण आली
तर डोक झाकु नका.....
जर काही गोष्टी नाही आवडल्या
तर सांगायला उशीर करू नका.....
कधी भेटाल तिथे एक स्माईल
देऊन बोलायला विसरू नका.....
कधी चूक झाल्यास माफ करा पण
कधी मैत्रीची जाणीव कमी
करू नका.....

कु. मयुरी कांमडी
बी.एस.सी. प्रथम

# परतीची वाट

कोणाच्या डोळ्यात स्वत:ला बघशील ?
कोणाच्या आसवाणा टिपशील
कोणाच्या निरर्थक गप्पामध्ये रमशील
कोणाच्या ओठावर हसू फुलवशील
समोरचा आरसा जेव्हा माझी वाट पाहीशिल
ट्राफिकचा गोंगाट ही जेव्हा शुल्लक वाद
गर्दीत ही ऐकटी राहशील, पुन्हा पुन्हा मागे पाहशील
मी नजरेस पडणार नाही, हताश घेऊन
जड पावलांनी पुढे चालशील
तू ही त्याच गर्दीत हरवुन जाशील
कुठे तरी.....
तू लाख स्वत: ला रमवशील, दुसऱ्यामध्ये
स्वत:ला हरवशील
नविन नात्यांना जोडशील.....
पण खरच सांग.....
काय मला विसरू शकशील ?
ती १० मिनीटे ही एका तपासारखी भासतील
सांग तेव्हा काय करशील.
कामात बुडकन जरी घेशील स्वत:ला
माझी आठवण येताच मोबाईल वर
मन नळकत जाईल
पण तो वाजणार नाही.
तुला काहीतरी चुकल्यासारखे
नक्की वाटेल
सांग तेव्हा काय करशील ?
मी नसेल तर तुला चित्रपट रटाळ वाटेवर
सुंदर धुनही बेकार वाटेल, पुस्तक नाराज वाटेल
मनातुन नळली----------
दिवसभर दुसऱ्याच्या चाणाक्ष नजरेन लपशील
उगाच किनाऱ्यावर माझी वाट बघशील
संध्याकाळी हुर - हुरशील माझा आठवणीत बैचेन
होशील
मावळत्या सूर्याला आपल्या अंश्रूचे अर्ध्या
देइन अलगद आपले दु:ख पिऊण हाकशील
आता तुच साग मी नसल्यावर
तुला खरच कोण तारेल.....

कु. मृणाली भस्मे
बी.एस.सी. प्रथम

# उत्तर एकाचे तरी देशील का?

जीतकी ओढ मला तुझी
तितकीच तुलाही आहे का?
जीतके प्रेम माझे तुझ्यावर तितकेच तुझ ही
आहे का?
मी समोर नसतानाही,
मला कधी पाहतेस का?
उत्तर रात्री शान्तसमयी,
स्वप्नात मला पाहतेस का?
ऐक क्षण मी दिसावे,
म्हणुन व्याकुळ होतेस का?
तो क्षण संपू नये,
असा विचार कधी करतेस का?
एकान्ती आपल्या गुजगोष्टी,
आठवुन कधी पाहतेस का?
त्यातल्या प्रत्येक शब्दाने
मोहरून कधी जातेस का?
माझा वेडेपणा आठवुन
स्वत: शी कधी हसतेस का?
माझ्या सोबत वेडे व्हावे,
असे कधी ठरवतेस का?
काळ ही सगळा संपून जाईल
विचारणे माझे संपणार नाही
प्रश्न माझे अनेक आहे
उत्तर एकाचे तरी देशील का

कु. राखी घोडमारे
बी.ए. प्रथम

# सावित्रीबाई फुले यांचे कार्य

आज सर्वच क्षेत्रांत पुरूषांबरोबर स्त्रियाही वावरताना दिसतात. याचे सर्व श्रेय सावित्रीबाई फुले यांनाच दयावे लागेल. कारण मुलींना सर्वप्रथम 'श्रीगणेशा' शिकवणाऱ्या त्या पहिल्या भारतीय शिक्षीका होत्या.

सावित्रीबाई फुले ह्या महात्मा फुले यांच्या पत्नी. त्यांच्या जन्म १८३१ साली, नायगाव (जि.सातारा) येथे झाला आणि १८४० मध्ये जोतिराव फुले यांच्याशी त्यांचे लग्न झाले. त्या काळात मुलींना शिक्षण दिले जात नसे. मुलींना शिक्षण दिले तर त्यांचे आयुष्य सुखाचे होईल, हे ओळखून महात्मा फुले यांनी मुलींची शाळा काढायचे ठरवले. पण त्या काळात मुलींना शिकवणारी शिक्षिकाच नव्हती.

आपला भारत देश जेव्हा इंग्रजांच्या गुलामगिरीत होता. तेव्हा स्त्रियांना मुलींना शिक्षणाची कसलीही सोय उपलब्ध नव्हती शाळेत मुलींना कुणीही पाठवत नव्हते. अशा काळात हया महान आईचा एका गरीब घरी म्हणजे ३ जानेवारी १८३१ ला जन्म झाला. त्यांच्या काळात मुलगी म्हणजे उपभोगाची वस्तु समजायचे 'चुल आणि मुल'हीच तिच्या नशीबी होती. परंतु महान क्रांतीकारी महात्मा जोतिबा फुले यांनी सावित्रीबाई सोबत सन १८४० ला लग्न केले त्यावेळी सावित्रीबाई अवघ्या ९ वर्षाच्या होत्या. सावित्रीबाईना सुध्दा काहीच लिहिता वाचता येत नव्हते. जोतिबांनी सावित्रीला शिकवलं. त्या शिकल्या लिहायला वाचायला. जेव्हा ज्योतीबा सावित्रीला धडे शिकवत होते, त्यावेळी समाजातील अशिक्षीत लोक 'टोमना' मारायचे त्यांची थट्टा करायची. पण त्यांची मनापासुन शिक्षण घेण्याची तयारी होती. त्यांनी आपली जिद्द कायम ठेवली व त्या बरेच काही गुण शिकल्या.



सावित्रीबाई पहिली भारतीय शिक्षिका झाल्या तेव्हा त्या अवघ्या १७ वर्षाच्या होत्या. ''शुद्रांना सांग जोगा शिक्षणमार्ग हा ! शिक्षणाने मनुष्यत्व पशुत्व हटते पहा '' असे एका कवितेत सावित्रीबाईनी म्हटले होते. ''आपल्या देशात अज्ञान, जातीभेद, भाषाभेद हे दुष्ट रोग आहेत. जातीभेदामुळे ज्यांना अनिवार्य दु:खे भोगावी लागतात त्यांच्यासाठी शिक्षण सुरू करणे हे खरे देशकार्य असल्याने आपण ते सुरू केले.'' जे लोक या देशाच्या सुखाची व कल्याणाची काळजी बाळगतात त्यांनी हा देश उत्तमावस्थेत यावा यासाठी बायकांना विदया शिकवली पाहिजे.

प्राथमिक शिक्षण सक्तीचे, मोफत आणि सार्वत्रिक करावे अशी देशातील आणि आशिया खंडातील पहिली मागणी १९ ऑक्टोबर १८८२ रोजी हंटर शिक्षण आयोगाकडे त्यांनी केली होती. शाळेतील सर्व मुलामुलींना जीवनात पुढे स्वतंत्र आणि स्वावलंबी होता यावे, मजेत जगता यावे यासाठी उदयोगाचे शिक्षण देण्याची व्यवस्था निर्माण करण्याचा दृष्टेपणा त्यांच्याकडे होता.

"Industrial Departments should be attached to the schools in which children would learn useful trades and crafts and be able on leaving school to maintain themselves comfort and independently." आजच्या काळात त्यांचा हा दृष्टेपणा पाहून थक्क व्हायला होते. निरक्षर पालक हा शिक्षणातला मोठा अडथळा असतो हे ओळखून स्वत:च्या घरात सावित्रीबाईनी १८५४ साली प्रौढ स्त्रियांसाठी रात्रशाळा सुरू केल्याची माहिती खुद्द

जोतीरावांनी दिली.

जेव्हा सावित्रीबाई शाळेत जाण्यास घरून निघायच्या तेव्हा गावचे लोक त्यांच्या अंगावर शेण-दगड मारून फेकायचे. बरेचदा बाईचे कपडे खराब व्हायचे परंतु मनात तिव्र जिद्द असतांना त्या काधी घाबरल्या नाही कारण मान-अपमान यांच्याकडे त्यांनी लक्षच दिले नाही. अपमानाची दिशा मानाकडे वळविली व शिक्षण सुरूच ठेवले. १८६४ ला त्यांनी अनाथ बाल आश्रम सुरू केले. त्यांच्या या कार्यक्रमाचे इंग्रजानी सुध्दा स्वागत केले.

पुढील अनेक चळवळीमध्ये जोतीराव अनुयायी आणि सावित्रीबाई नेत्या असल्याची लेखी कबुली देऊन जोतीरावांनी त्यांच्या नेतृत्त्वागुणांची प्रशंसा केलेली आहे. ''स्थापाया अधिकार या बायकांचे झटतसे मी सदा अर्पाया न भी किमपिटी सर्वस्व माझे कदा ! अशी वराला मंगलाष्टकामधुन प्रतिज्ञा वदवायला लावणारी सत्यशोधक विवाह पध्दती, ब्राम्हण विधवांच्या बाळतपणासाठी आणि त्यांच्या मुलांच्या संगोपणासाठी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू करून त्यात उपस्त्रियांची बाळंतपणे पोटच्या मुलीच्या मायेने त्यांनी केली. दुष्काळात सुमारे एक हजार मुलां-मुलीच्या मदतीसाठी छावणी सुरू करून, विधवांच्या केशवपणाविरूद्ध ना. म. लोखंड्याच्या साथीने केलेला नाभिकांचा संप घडवला. या कामांच्या वेळी जोतीराव फुले हयात होते. सावित्रीबाई त्यांच्या नेत्या होत्या.

जोतीरावाच्या अत्यंतयात्रेचे नेतृत्व सावित्रीबाईनी केले. स्वत: टिहवे धरले. अग्नी दिली. ओतुर, सासवड आदी सत्यशोधक परिषदांचे अध्यक्षपण भुषवले. सहा पुस्तके लिहिली. फेब्रुवारी - मार्च १८९७ च्या प्लेगच्या भयंकर साथीत रूग्णांना मदत करण्यासाठी जीव धोक्यात घालून त्यांनी औषधोपचार केले. पांडुरंग बाबाजी गायकवाड या मुंठण्याच्या महार समाजातील मुलाला पाठीवर घालून त्या हडपसरला ससाणे मळ्यात डॉ. यशवंताच्या दवाखाण्यात घेऊन गेल्या. त्याला बरे केले.

पुण्यामध्ये २८ नोव्हेंबर १८९० ला प्लेगच्या साथीने ज्योतिबा दगावले व सात वर्षानंतर १० मार्च १८९७ ला भारताच्या पहिल्या शिक्षीका सावित्रीबाई फुले यांनी शेवटचा श्वास घेतला. शहीद झाल्या. अशा स्वतंत्र व्यक्तीमत्त्वाच्या एका समर्पित, दृष्ट्या शिक्षण तज्ञाचे नाव विदयापिठाला दिले.

ज्या पुण्यात त्यांचा कामाला आधी १८४८ ला विरोध झाला त्याच कर्मभुमीत शतकानंतर १९४८ साली पुणे विदयापीठ उभे राहीले.

''शिक्षणाने मनुष्यत्व येते, पशुत्व हरते पहा !
विदया हे धन आहे रे, श्रेष्ठ साऱ्या धना हून
तिचा साठा जयापाशी तो ज्ञानी मानिती जन
मुलींना शिकवा, भेदाभेद हटवा, असं नुसतं सांगुन जमायचं नाही,
शिक्षण देऊन शहाणं करायचा, दुसरा काही उपायच नाही

समाजात स्त्री - पुरूष समानता प्रस्थापित करण्यासाठी स्त्रीमुक्ती आंदोलनात सर्वस्व वाहून घेणारे भारतीय इतिहासातले जोतीराव व सावित्रीबाई फुले हे पहिले दांपत्य होय. स्त्रीशिक्षणाच्या अग्रदुत आणि स्त्री स्वातंत्र्यांच्या प्रयत्नात सावित्रीबाई यांची मोलाची कामगिरी आहे.

*जे देशासाठी लढले,*
*ते अमर हुमात्मे झाले.*
*सोडीले सर्व संसार,*
*सोडीले सर्व घरदार*

कु. समिक्षा भुडे
बी.एस.सी. प्रथम

# वियोग

आज मला विसरलास तू
उद्या मात्र आठवशील
डोळे मिटवशील जेव्हा तू
स्वप्नातही मलाच पाहशील.....

रडशील जेव्हा तू डोळे तुझे
अन् अश्रू हातावर झेलशील
त्या अश्रूच्या थेंबातही
मला शोधशील तू

जाशील कधी त्या वाटेवरून
जिथे मी प्रथम तुला भेटले
आजही ती वाट सरताना
मलाच उभी तू पाहशील....

राहशील दारात उभा तू
अन् अंगणात मला पाहशील
खळखळून हसत दिसेन मी तुला
मात्र डोळे तुझे राहतील.....!

विरह छळणार त्या अंधाऱ्या रात्री
अन् नभात तू पाहशील
त्या चंद्राच्या शीतल प्रकाशात
गारवा माझ्या प्रेमाचाच जाणवशील.....!

ते क्षण विलग होण्याचे
जेव्हा हृदयात तुझ्या टोचतील
प्रार्थना करशील देवापुढे तू
अन् मागण्यातही मलाच मागशील

विलग झाली जिथून मी
त्या जागेवर तू भिरभिरशील
मी परतून येणार या आशेत
त्या वाटेवर माझीच वाट पाहशील.....!

कु. काजल बोबडे
बी.एस.सी. प्रथम

# राजनेता

नेता और राजनेता की
कोई जात नाही होती ।
इनके बाप तो होते है
पर माँ नही होती ।

अक्का ओंके इशारो पर
चलता इनका राज !
मुर्दो के कफन बेचने भी
ये कभी न आते बाज ।

यारो तुम्हारी हमारी उनके
सामने क्या गिनती है ।
हर पाँच साल के बाद
इनकी संस्था बढ़ती है ।

गरीबो को और गरीब बनने
इनके बाये हाथ का खेल है
दंगे, खुन खराबा करना
यही असली मैल है ।

खुर्चि के लिए सिना झपट्टी
इनको हमेशा रहती है ।
उन्हीके इशारो पर तो
अपनी राजनीती चलती है ।

सत्यनिती चलाने यह
कुछ भी खाते रहते है ।
अगर इनको कुछ न मिले
तो चारा भी हडप लेते है ।

हवाला घोटाला इनके
अर्थकोष की पूंजी है ।
देश भला ही बिक जाये
जिनकी इनकी कुंजी है ।

पहले के राजनेता ओने
बनाया है इस देश को ।
अभी के नेताओ ने
बेच खाया अपने आप को ।

इनके ही आदते आजकल
हममे, तुममे आने लगी ।
चोरी, डाका, खुन खराबे
गले से गले मिलने लगी ।

आज के रक्षक बन गये भक्षक
नजारा बड़ा दुःखदाई है ।
किसको अपेक्षा करोगे तुम
जिना बड़ा विपदाई है.....।

कु. नेहा तळवेकर
बी.एस.सी. प्रथम

# या भारतात बंधुभाव नित्य वसू दे



या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, दे वरचि असा दे
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे

नांदोत सुखे गरीब-अमीर एक मतांनी
मग हिंदू असो ख्रिश्चन वा हो इस्लामी
स्वातंत्र्य-सुखा या सकलांमाजि वसू दे
दे वरचि असा दे

सकळांस कळो मानवता, राष्ट्रभावना
हो सर्व स्थळी मिळुनी समुदाय प्रार्थना
उद्योगी तरूण शीलवान येथे असू दे
दे वरचि असा दे

जातिभाव विसरूनिया एक हो आम्ही
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी
खलनिंदका मनीही सत्य न्याय वसू दे
दे वरचि असा दे

सौंदर्य रमो घराघरात स्वर्गीयापरी
ही नष्ट होऊ दे विपत्ती भीती बावरी
तुकड्यास सदा या सेवेमाजी वसू
दे वरचि असा दे

- संत तुकडोजी महाराज

# मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयाच्या गौरवात भर घालणारे प्राध्यापक व विद्यार्थीनी



**प्रा. अभय दांडेकर**

सेट परिक्षा उत्तीर्ण (विषय इंग्रजी)






**प्रा. डॉ. सुवर्णलता बागडे**

आचार्य पदवी प्राप्त



**कु. कोमल खडके**

(कला शाखा)

विद्यापीठ कलरकोट

सुवर्ण पदक

राज्य स्तरिय ज्युदो स्पर्धा, पुणे



**कु. संस्कृति चौधरी**

(विज्ञान शाखा)

विद्यापीठ कलरकोट



**कु. रूचीता देहारकर**

(कला शाखा)

सुवर्ण पदक

राज्य स्तरिय ज्युदो स्पर्धा, पुणे



**कु. साक्षी देशमुख**

(कला शाखा)

सुवर्ण पदक

राज्य स्तरिय ज्युदो स्पर्धा, नाशिक



**कु. संजना चौधरी**

(कला शाखा)

राष्ट्रीय कराटे स्पर्धा, वर्धा

## अध्यापक वृंद



डॉ. उमेश तुळसकर (इतिहास) | प्रा. सपना जयस्वाल (वाणिज्य) | प्रा. डॉ. उमेश मोरे (वनस्पतीशास्त्र) | प्रा. अभय दांढेकर (इंग्रजी) | प्रा. श्रुती जयस्वाल (वाणिज्य) | प्रा. अश्विनी चौध (प्राणिशास्त्र)



प्रा. वैशाली तडस (वाणिज्य) | प्रा. सुवर्णा कान्होलीकर (समाजशास्त्र) | प्रा. मोनीका माऊस्कर (गणित) | प्रा. विद्या झिलपे (भौतिकशास्त्र) | प्रा. डॉ. स्वर्णलता बागडे (हिन्दी) | प्रा. मोनाली गिर (रसायनशास्त्र)



प्रा. खुशबू राठी (भौतिकशास्त्र) | प्रा. स्वाती लिंगे (रसायनशास्त्र) | प्रा. योगीता महल्ले (गणित) | प्रा. पुनम बुरिले (मराठी) | प्रा. भाग्यश्री साबळे (मराठी) | प्रा. स्नेहल वाक (वाणिज्य)



प्रा. संगीता लांडगे (इंग्रजी) | प्रा. आशा घाटे (गृहअर्थशास्त्र) | प्रा. प्रिती दुबे (राज्यशास्त्र) | प्रा. श्रद्धा चाफले (वनस्पतीशास्त्र) | प्रा. अंकिता पिसुड्डे (वनस्पतीशास्त्र) | प्रा. मंगला बांगडे (इतिहास)

## अध्यापकेत्तर वृंद



श्री. अमित रेंढे (लिपीक) | श्री. योगेश ढगे (लिपीक) | कु. मनिषा थुटे (ग्रंथालय परिचर) | श्री. प्रणय भेंडे (प्रयोगशाळा परिचर) | श्री. अक्षय तुळसकर (प्रयोगशाळा परिचर) | श्री. उमेश खोडे (प्रयोगशाळा सहायक)



श्री. अमित आंबटकर (प्रयोगशाळा परिचर) | श्री. शुभम तुळसकर (प्रयोगशाळा परिचर) | श्री. श्याम सातपुते (शिपाई) | श्रीमती ताराबाई जायदे (शिपाई) | श्री. दिलीपराव शिंदे (चौकीदार)

## महाविद्यालयाची नविन इमारत भुमिपूजन सोहळा



## शैक्षणिक उपक्रम

















# सांस्कृतीक महोत्सव


Annual


Women's College, Hinganghat
Annual
Gathering


Matoshri Ashatai Kunawar Arts, Commerce and Science
Women's College, Hinganghat
Annual
Gathering











# शैक्षणिक उपक्रम














ग्रंथालय







''हिंगणघाट क्षेत्रातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणून तळागाळापर्यंत उच्च शिक्षणाची गंगोत्री पोहचवून महिला सक्षमिकरणाच्या दिशेने टाकलेले पाऊल पुर्णत्वास जाण्याचा संकल्प आणि त्याच उद्देशाने प्रेरीत होवून केलेला हा यशस्वी प्रयत्न'

....... पांडुरंग तुकसकर

## मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयीन विविध शाखा

**कला शाखा**
(B.A.)
(मराठी माध्यम)
प्रथम व द्वितीय वर्ष

**वाणिज्य शाखा**
(B.Com)
(इंग्रजी माध्यम)
प्रथम व द्वितीय वर्ष

**विज्ञान शाखा**
(B.Sc.)
प्रथम व द्वितीय वर्ष

### संस्थेद्वारे चालविण्यात येणारे विविध शाळा व महाविद्यालय -

- विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर (पदव्युत्तर शाखा) इतिहास, समाजशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, वनस्पतीशास्त्र
- विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर
- विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, समुद्रपूर
- विद्या विकास उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम, समुद्रपूर
- विद्या विकास प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यालय, हिंगणघाट
- विद्या विकास हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, हिंगणघाट
- मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट